Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*([https://jetjournal.us/](https://jetjournal.us/))*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# दलित कवयित्रींचे मराठी साहित्यात योगदान

**प्रा. योगेश देविदास पाटील**, सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, प्रताप महाविद्यालय (स्वायत्त), अमळनेर जि.जळगाव

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीदर्शी विचाराने दलित साहित्याची मुहूर्तमेढ मराठी वाङ्मयात रोवली गेली. साठोत्तरी प्रवाहात दलित वाङ्मयाला महत्त्वाचे स्थान लाभले ते त्याच्या वेगळेपणामुळे. या साहित्यातील कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन इ. वाङ्मय प्रकारात दलित शोषितांचे जीवन अधोरेखित झाले आहे. हजारो वर्षांपासून लादलेल्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध आवाज उठविला गेला. दलित साहित्यातील कविता या प्रकारांतून प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुद्ध नकार व विद्रोहाची भाषा व्यक्त केली गेली आहे. अगदी पहिल्या पिढीच्या कवींपासून ते आतापर्यंत ही नकार विद्रोहाची भाषा अलीकडच्या नव्या पिढीतील कविपर्यंत होत आली आहे. दलित साहित्यात विशेषत: दलित कवितेत स्त्रियांनी आपला सहभाग उत्स्फूर्तपणे नोंदवला आहे असे दिसून येते.

दलित कविता म्हणजे समाजातील शोषित, पीडित आणि अन्यायग्रस्त वर्गाच्या वेदना, संघर्ष आणि आत्मसन्मानाचे प्रतिबिंब आहे. दलित साहित्याच्या चळवळीच्या माध्यमातून या कवितांनी मराठी साहित्यात नवा आयाम निर्माण केला.

**संबोध शब्द**

क्रांतीदर्शी, मराठी वाङ्मय, दलित वाङ्मय, साठोत्तरी प्रवाह, आत्मकथन, मानवी मूल्य, तेजस्त्री, हुंकार, आशय व सामाजिकता.

**विषय प्रवेश**

डॉ. बाबासाहेब आबेडकर हे स्त्रीमुक्ती चळवळीचे प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांनी भारतीय संविधानातून स्त्रियांना पुरुषांबरोबरीचे अधिकार प्रदान केले आहेत. दलित कवितेचा विचार करता दलित कवयित्रीच्या कवितेचा विचार करणे क्रमपात्र ठरते, ज्यात हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, सुरेखा भगत, प्रज्ञा दया पवार, प्रतिभा अहिरे, उषा अंभोरे, उषा हिंगोणेकर, कुसुमताई गांगुर्डे, पुष्पा कांबळे, संध्या रंगारी, छाया कोरेगावकर, माया दामोदर, नीला वाघमारे, कविता मोरवणकर, यशोधरा गायकवाड इत्यादी. दलित कवयित्रींनी आपल्या कवितेतून स्त्रियांच्या अनेकविध सुखदु:खांना हात घातला आहे. या शोधनिबंधात वरील कवयित्रींच्या कवितेचा परामर्श घेतलेला आहे.

संध्या रंगारी या दलित कवयित्रीमध्ये महत्वाच्या कवयित्री म्हणून ओळखल्या जातात. संध्या रंगारी यांचे 'आघात' आणि 'कवडसे' हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या कवितेने दलित कवितेला एक नवा आयाम दिला आहे. संध्या रंगारी बोधी वृक्षाचे खालीलप्रमाणे वर्णन करतात,

"पेरावेत कवितेने शब्दांच्या मातीत
बोधी वृक्षांची बिजे
प्रज्ञा, शील, करुणेची गार सावली
शमून जावी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

विषमतेची काहिली"[१]

प्रस्तुत काव्यसंग्रहात असणाऱ्या वरील कवितेच्या आशयावरून कवयित्रींची सामाजिक जाण प्रकटताना दिसते. आयुष्यात वाट्याला येणारी वेदना व त्यातून घडत गेलेला जीवनप्रवास जेव्हा 'शमून जावी विषमतेची काहिली' अशा रीतीने कवयित्री शब्दबद्ध करते.

कविता मोरवणकर यांना अभिप्रेत असलेली अभिलाषा ही त्यांच्या 'मुक्ता' या संग्रहातून आविष्कृत झाली आहे. स्त्री शिक्षणामुळेच स्त्रीचा उद्धार करू शकते, परंतु तिच्या भोवताली वावरणारी सामाजिकता, जात, वर्ण भेद या हिंसक वृत्तीमुळे स्त्रियांचा पडणारा निष्पाप बळी, यामुळे दुःखी झालेले कवी मन केव्हा लेखणी घेते अन् लढायला सिद्ध होते. लढल्याशिवाय स्त्रिचा उद्धार होणार नाही हे कवयित्रीला ज्ञात आहे. म्हणून बाबासाहेबांना अभिवादन करून त्या आपल्या कवितेतून त्यांचे अनेक चित्र साकारतात. अशा प्रकारची ही सामाजिक कविता आहे.

नीला वाघमारे यांचा 'आराम' हा काव्यसंग्रह मृणाल आर्ट प्रकाशन, मुंबईने प्रकाशित केला आहे. नीला वाघमारे या कवयित्रीने गझल हा काव्यप्रकार हाताळला आहे. कॉलेज जीवनातच नीला वाघमारे यांच्या व्यक्तिमत्वावर सुरेश भट यांच्या गझलांचे संस्कार झाले. त्यांनी आपल्या खास अनुभूती 'गझल' या छंदातून ही आरास मांडली आहे.

"सारा पाहून तमाशा,
असे मन हे विटले,
कधी-कधी अंतरात वाटे,
आभाळ फाटले."[२]

देशातील माणसाची वखवखलेली स्वार्थाद वृत्ती व मानवी मूल्यांची होणारी पडझड त्यांनी आपल्या गजलमधून टिपली आहे. उषा हिंगोणेकर यांचा 'मुद्रालेख' सुविध प्रकाशन, पुणे, येथून १९९९ ला प्रकाशित झालेला आहे. या संग्रहातील कविता सशक्त आंबेडकरी जाणिवेतून अनुभूतीच्या दाहक वास्तवाचे तेजस्वी स्त्री हुंकार आहे.

यांच्या कवितेबाबत डॉ. गंगाधर पानतावणे आपला अभिप्राय नोंदवताना म्हणतात, "आत्मकोशात रंगणारी ही कविता नाही. दाहक वास्तवाचे भान तिला आहे. सामाजिकता आणि सांस्कृतिकतेचा वेध घेणारी ही कविता मराठी कवितेला नवा आशय प्रदान करते."[३] कवयित्री या विश्वास कोणावर विश्वास ठेवावा यासंदर्भात म्हणते,

"ठेच लागते आहे पावलांना,
या विश्वात
कुणावर विश्वास ठेवावा,
कळतच नाहीय?"[४]

कवयित्री च्या मते, कुठल्याही क्षणी उद्ध्वस्त होऊ शकतो हे ओळखूनच दोस्तहो आता रस्त्यावर यावे लागेल. पुरुषी व्यवस्थेने पेरलेले हे सुरुंग आणि यामुळे विद्विग्न होणारे स्त्री जीवन हताश न होता रस्त्यावर येण्याची भाषा कशी अपरिहार्य आहे. अशा भाषेचा अंगीकार करीत ही कविता अभिव्यक्त होते.

माया दामोदर यांचे 'जागृती' (२००८), व 'संस्कृती' हे दोन काव्य संग्रह व कथा वाङ्मय, कादंबरी वाङ्मय असे साहित्याचे सर्वच प्रकार त्यांनी हाताळले आहेत. त्या केवळ शाब्दिकच प्रबोधन करीत नाही तर


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

स्त्रियांच्या उत्कर्षासाठी त्यांनी आपले जीवन वाहुन घेतले आहे. दलित स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात आवाज उठवून त्यांना न्याय मिळवण्याच्या इराद्याने व डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणेने त्यांनी आपली लेखणी शस्त्र माणून उचलली आहे.

छाया कोरेगावकर यांचे 'आकांत प्रिय माझा' (१९९९) व 'एक अवकाश माझंही' (२०१०) असे दोन संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. वयाच्या तेराव्या वर्षापासून काव्यलेखनाला त्यांनी सुरुवात केली आहे. अनेक नियतकालिकांतून व वृत्तपत्रातून त्यांची कविता सातत्याने वाचकांच्या समोर आहे. एक स्त्री म्हणून आलेले अनेक बरे-वाईट प्रसंग त्यांनी आपल्या कवितेतून चित्रित केले आहेत.

हिरा बनसोडे यांचे 'पौर्णिमा' (१९७०), 'फिर्याद' (१९८४) व 'फिनिक्स' (२००१) हा अलीकडचा काव्यसंग्रह बराच चर्चेत आहे. हिरा बनसोडे ह्या दलित कवितेच्या पहिल्या पिढीतील कवयित्री म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या कवितेतून दलित, संचित, उपेक्षित स्त्रीच्या वाट्याला आलेले जीवनानुभव बोलके होतात. या स्वतंत्र देशात स्त्री गुलाम आहे, तिच्यावर अनन्वित छळ केला जातो. संस्कृतीने चालवलेल्या या अन्यायाविरुद्ध हिरा बनसोडे आपली फिर्याद समाजाच्या न्यायालयात नोंदवताना म्हणतात-

"लोकहो। तुमच्या न्यायालयात
मी फिर्याद आणली आहे
तुम्ही तरी माला न्याय द्याल का?"[५]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित होऊन कवितेच्या साठोत्तरी प्रवाहात स्त्रियांच्या प्रखर रोषात्मक सामाजिक जाणिवांची हिरा बनसोडे यांनी दखल घेतली आहे.

सुरेखा भगत यांचा 'साक्ष' (१९९४) हा कवितासंग्रह ताकदीने दलित जाणिवा प्रखरतेने मांडतो. सुरेखा भगत यांच्या व्यक्तिमत्वाची साक्ष देतो. आंबेडकरी तत्त्वज्ञानाचे बळ लाभलेली पण तरीही जीवनातील वेदनेची कळ प्राणपणाने जपणारी सुरेखा भगत यांची कविता मूलतः चिंतनशील प्रवृत्तीची आहे. स्त्री म्हणून सोसाव्या लागणाऱ्या 'या मनाचे सल' या कवितेत कवयित्री म्हणतात,

"काळजात असे किती विखार फुलवावे
अन् जोगवावे
सुखद आठवणी जोपासल्यागत?
धरणीकंप व्हावा अन उखडून जावे."[६]

सुरेखा भगत यांची कविता अशी आत्मसंवादी आहे. हा संवाद अंतर्मुख करणारा आहे. सुरेखा भगत यांची कविता सामाजिक आशयाची, विद्रोही तशीच प्रबोधनात्मक आहे. आत्मशोध हे या कवितेचं वैशीष्ट्य आहे.

डॉ. ज्योती लांजेवार फुले-आंबेडकर चळवळीतील दमदार कवयित्री म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या 'दिशा' (१९८०), 'शब्दनिळे आभाळ' (१९९२), 'अजून वादळ उठले नाही' (२०००), 'एका झाडाचे आक्रंदन' (२००८) इ. काव्यसंग्रहांबरोबरच त्यांचे कथा वाङ्मय, वैचारिक लेखन, समीक्षा संशोधनात्मक ग्रंथसंपदा प्रकाशित आहे. ज्योती लांजेवार यांच्या कवितेतून तत्कालीन समाज जीवनात वावरणाऱ्या विविध वृत्ती-प्रवृत्ती आविष्कृत होतात. त्यांच्या कवितेसंदर्भात प्रा. पुष्पा गायकवाड लिहितात, "कवयित्री “ज्योती लांजेवार यांची कविता नवसमाजातील स्थित्यंतराकडे स्त्रियांना कोणत्या दृष्टिकोनातून पाहावे लागणार आहे, हे सांगताना ती वर्तमानातील वास्तवता प्रकट करते व भविष्यातील क्रांतीची ललकारीही देते."[७] ते खरे आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

विज्ञानयुगात स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन किती बेगडी आहे. कवयित्री डॉ. ज्योती लांजेवार आपल्या कवितेत म्हणतात,

"आता मी भडकवणार आग,
माणुसकीच्या हक्कांसाठी.
मला पातकी म्हटलं तरी चालेल."[८]

दलित समाजात परिवर्तन घडवून आणण्याची ताकद असलेली, दलितांच्या वेदना शब्दांत समर्थपणे व्यक्त करणारी ही कविता आहे. सामाजिकता हा तिथा स्थायीभाव आहे. प्रतिभा अहिरे यांचा 'मला हवी असणारी पहाट' हा कवितासंग्रह, फुले-आंबेडकरी तत्वज्ञानातून साकार झालेला हा अस्सल स्त्रीवादी काव्य संग्रह आहे. स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार कवयित्रीने आपल्या कवितेतून केला दिसून येतो.

"संपू पाहतेय मी या चक्रव्यूहाला छेदण्या अन् भेदण्यातच
माझ्या स्त्रीत्यानं ओढलेल्या अन् वेढलेल्या
कुणाकुणाला टाळण्या-फेटाळण्यातच खर्च करावे
सामध्ये ही असुरक्षितता नकोय रे."[९]

कवयित्रीचा हा आकांत समय स्त्रियांचाच आकांत आहे. हा तिच्या संपूर्ण मनुष्यत्वाचाच पुरस्कार आहे. या कवितेसंदर्भात डॉ. मनोहर यशवंत लिहितात, "स्त्रीच्या मनुष्यत्वाच्या पडझडीचे उगम येथे आहेत, स्त्री मुक्तीसाठी हे उगम उद्ध्वस्त करता यायला हवेत. तिला गुलाम करणाऱ्या धर्मापासून, तत्वज्ञानापासून आणि अशा सर्वच संस्कारापासून स्त्रीला वेगळे करता यायला हवे. खुद्द तिनेही पवित्र मानलेले तिचे मारेकरी मानसशास्त्र तिने स्वत;च जाळून टाकले पाहिजे, या मानसशास्त्राचे अस्तित्व कायम राखून स्त्रीमुक्ती शक्य नाही.

हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार या कवयित्रींसोबतच कुसुमताई गांगुर्डे या कवयित्रीचा उल्लेख करावा लागतो. कुसुमताई गांगुर्डे यांचा 'वळणाची वाट' हा कविता संग्रह १९८८ प्रकाशित झाला. लागतो. त्यांच्या 'वळणाची वाट'मधील कविता सशक्त व स्त्रियांची जाणीव असलेली कविता आहे. महिला सबलीकरण, महिलांचे राजकारण, समाजकारण, धार्मिक मूल्यांची जोपासना करणारी कुसुमताई गांगुर्डे यांची वृत्ती ठायी ठायी दिसते. त्यांच्या कवितेसंदर्भात नीलकांत चव्हाण म्हणतात, "कुसुमताई गांगुर्डे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, सामाजिक, धार्मिक, साहित्य या क्षेत्रात त्यांची भरीव कामगिरी जीवनाच्या विविध क्षेत्रातून जाताना त्याना जे ने अनुभव आले तेच त्यांनी प्रांजळपणे आपल्या कवितेत मांडले आहेत. डॉ. बाबासाहेबाना अभिवादन करून त्या आपल्या कवितेत म्हणतात,

"सागराचा महासागर
ज्ञानाचे उत्तुंग शिखर
लख्ख प्रकाशाने तुझ्या
उजळले माझे नगर"[१०]

कवयित्री म्हणते की, डॉ. बाबासाहेबांमुळे मी प्रबुद्ध, प्रज्ञावान झाले आहे. बाबासाहेबांना महासागर व ज्ञानाचे उत्तुंग शिखर अशा उपमा समाजाने दिल्या आहेत. पुष्पा कांबळे यांचे 'अंतरीचे उसासे' (२००४), 'जपलेल्या जखमा' (२००३) व 'स्त्रीच्या नाळेत त्याची शेपटी अडकल्याने' (२०१०) असे तीन संग्रह प्रसिद्ध आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीचे समान हक्क स्त्रियांना दिले जात नाही. तिला पायाची वहाण समजून गुलाम


Copyright © | JET Network, All Rights Reserved

बनविलं जातं. तिच्या भावनांची कदर केली जात नाही, स्त्री म्हणून पदरी आलेली घुसमट, नामुष्कीली, या व्यवस्थेत भरडली जाणारी स्त्रीची अगतिकता, नैतिकता, भोगवस्तू म्हणून तिच्याकडे पाहिला जाणारा दृष्टिकोन असे अनेक प्रश्न कवयित्री पुष्पा कांबळे यांनी 'अंतरीचे उसासे' या संग्रहात उपस्थित केले आहेत. त्यांच्या कवितेच्या भाषेत सांगायचे झाले तर,

"पूर आसवांचा । थोपवताना आलाच नाही,
भावनांचे कवच फोडताच आले नाही"[११]

स्त्रियांचे हक्क, अधिकारांची होणारी पायमल्ली स्वातंत्र्यानंतरही सुरूच आहे. हक्क नाकारणाऱ्या या पांढरपेशीय संस्कृतीविरुद्ध कवयित्री संताप व्यक्त करते. या कवितेबाबत भगवान ठग म्हणतात, "बाबासाहेब आंबेडकरांना गुरुस्थानी मानणारी, त्यांच्या विचारावर पोषित असलेली ही कविता दलित कवितेला नवी ऊर्जा देणारी आहे."[१२] अशी ही ऊर्जात्मक कविता आहे.

प्रज्ञा दया पवार यांचे 'अंतस्थ' (१९९३), 'उत्कृष्ट', 'जीवघेण्या धगीवर' (२००२), 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' (२००७),' आरपार लयीत प्राणांतिक' (२००९) इ. कवितेसोबत त्यांचे कथा साहित्य, स्तंभलेख संपादन असे अनेक ग्रंथ प्रकाशित आहेत, त्यांच्या कवितेतून सामाजिक आशयासोबत राजकीय, धार्मिक, सांस्कृतिकतेवर कवयित्रीने प्रखर हल्ला केला आहे. त्यांच्या कवितेसंदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, "वर्षानुवर्षे स्त्री दबलेली होती. शोषित होती पण तिचा आवाज मोकळा झाला आहे. याच्या खुणा 'अंतस्थ' या काव्यसंग्रहात दिसतात."[१३] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या कवितेला 'अत्वदीप भव' ची दिशा दिली होती. ती स्त्रीमुक्तीची दिशा होती. आंबेडकरवादाने प्रभावित असलेल्या प्रज्ञा दया पवार आपल्या कवितेत म्हणतात,

"आपल्यातच किती अंतस्थ रूपे
वावरत असतात
एकमेकींना अनोळखी असल्यागत"[१४]

स्त्री मनाचे कप्पे आणि जाणिवांचे पदर त्या कवितेतून उलगडून दाखवितात.

**समारोप**

१. दलित स्त्रीची कविता ही केवळ एका स्त्रीची कविता नाही, तर ती स्त्री-समाजाची कविता आहे. या कवितेला समाजाचे प्रतिनिधित्व लाभले आहे.
२. वर्तमानातील अनेक समस्या आजच्या स्त्रीपुढे आहेत. स्वतःची द्रौपदी, सीता न होऊ देता शील, प्रज्ञा, करुणा जपत व स्वाभिमानासह 'स्व' या उत्कर्ष साधण्यासाठी ही कविता सक्षम आहे.
३. दलित कवितेच्या या सक्षमपणामागे बुद्ध, कबीर, सावित्रीबाई फुले व बाबासाहेब यांचे वैचारिक अधिमान आहे. म्हणून दलिन कवयित्रींच्या कवितेतील सामाजिक जाणिवेला वाङ्मयीन मूल्ये प्राप्त झालेली आहेत.
४. दलित कविता अन्यायाविरुद्ध लढा देण्याची प्रेरणा देतात. त्यामुळे त्यांची भाषा स्पष्ट आणि थेट मांडणी अर्थात भाषाशैली साधी, पण प्रभावी असते.
५. दलित कविता स्वत:ची ओळख, दलित अस्मिता, आत्मसन्मान आणि स्वाभिमानावर आधारलेली आहे. त्या कवितांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचारांचा प्रभाव अनेक कवितांवर दिसून येतो.
६. दलित कवितांमध्ये सामाजिक परिवर्तनाचा ध्यास, जातिभेद, अंधश्रद्धा, शोषणाविरुद्ध आवाज इत्यादी भाव दिसून येतात.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**संदर्भ सूची**

१. गायकवाड प्रा. पुष्पा, 'मराठी साहित्य दलित स्त्री व जातीय संघर्ष', गोरवाणी, ऑक्टोबर ते डिसेंबर, २०११, पृ. क्र. ४४
२. चव्हाण नीलकांत, 'वळणाची वाट', गांगुर्डे कुसुमताई, डॉ. बा. आ. लोकशिक्षण व्याख्यानमाला, मुंबई प्र. आ. १९८८, (मलपृष्ठ)
३. फडके हॉ. भालचंद्र, 'अंतस्थ', लोखंडे प्रज्ञा, मानसन्मान प्रकाशन, पुणे, प्र.आ. २०१३, पृ. क्र. ०३ (प्रस्तावना)
४. मनोहर डॉ. यशवंत, 'मला हवी असणारी पहाट', आहिरे प्रतिभा, इंप्रेशन्स पब्लिशिंग हाऊस, बेळगाव, प्र.आ. १९९७, पृ. क्र. ०७
५. पानतावणे डॉ. गंगाधर, 'मुद्रालेख', हिंगोणेकर उषा,, सुविद्य प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९१९, पृ. क्र. ०२
६. भगत सुरेखा, 'साक्ष', पृ. क्र. ३७ (सल)
७. लांजेवार डॉ. ज्योती, 'दिशा', पृ. क्र. ०६ (दिशा)
८. उपरोक्त, गायकवाड प्रा. पुष्पा, पृ. क्र. ५५
९. अहिरे प्रतिभा, 'मला हवी असणारी पहाट', पृ. क्र. ०७
१०. गांगुर्डे कुसुमताई, 'वळणाची वाट', पृ. क्र. ०३ (तुझे गीत)
११. कांबळे पुष्पा, 'अंतरीचे उसासे', पृ. क्र. ०५
१२. उपरोक्त, चव्हाण नीलकांत, पृ. क्र. २२
१३. उपरोक्त, गायकवाड प्रा. पुष्पा, पृ. क्र. ७२
१४. पवार प्रज्ञा, 'अंतस्थ', पृ. क्र. ०४


Copyright © | JET Network, All Rights Reserved